# CONTENTS


| Sr. No. | Research Papers | Page No. |
|---|---|---|
| 1. | साहित्याचे शास्त्रीय व वैज्ञानिक दृष्टिकोनातून इतिहास लेखन<br>डॉ. सुदर्शन दिवसे | 1-7 |
| 2. | मराठी कवितेचा इतिहास<br>डॉ. गणेश मालटे | 8-13 |
| 3. | मराठी ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कथा साहित्याचे वाङ्मयेतिहास लेखनाचे नव दृष्टिकोन<br>प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले | 14-16 |
| 4. | दलित साहित्याच्या नामांतराचा इतिहास:अवलोकन आणि चिकित्सा<br>प्रा.डॉ.आनंद गो.इंजेगावकर | 17-19 |
| 5. | १९९० नंतरच्या काळातील कादंबरीचे स्वरूप व परिचय<br>प्रा.गजानन आनंता देवकर | 20-22 |
| 6. | आंबेडकरवादी वाङ्मयाचा इतिहास : काही प्रश्न<br>प्रा.डॉ.गणपती जोतीबा मोरे | 23-24 |
| 7. | दलित साहित्याचा इतिहास: एक नवा दृष्टिकोन<br>प्रा.डॉ.संतोष हंकारे, | 25-27 |
| 8. | ग्रामीण साहित्य इतिहास लेखनाचे नवे दृष्टिकोन<br>डॉ. राजीव यशवंते | 28-30 |
| 9. | मराठी कथेच्या इतिहासातील दलित संवेदना<br>डॉ. पंजाब लक्ष्मणराव शेरे | 31-33 |
| 10. | मराठी चरित्र वाङ्मयाचा इतिहास : एक वेध<br>डॉ.रामदिनेवार गोविंद शंकरराव | 34-36 |
| 11. | स्त्रीवादी मराठी साहित्य प्रवाह निर्मिती व वर्तमान स्थिती.<br>प्रा. डॉ. दिलीप साहेबराव सावंत | 37-39 |
| 12. | मराठीतील स्त्रियांचे नाट्यलेखन (प्रारंभकाळ ते २००५)<br>प्रा. डॉ. बालाजी पोतुलवार | 40-46 |
| 13. | स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीवादी मराठी कथा : एक निरीक्षण<br>प्रा. डॉ. नरवाडे बी. व्ही. | 47-49 |
| 14. | समकालीन शैक्षणिक मुल्यऱ्हासाचे वास्तवदर्शी चित्रण : पांढरे हत्ती<br>श्री. रामनाथ श्रीपती फुटाणे | 50-53 |
| 15. | दलित स्त्रियांची आत्मकथने : एक पुनर्विलोकन<br>प्रा.डॉ.रमेश वसंतराव गटकळ | 54-56 |


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

SPECIAL ISSUE Vol. VI | Feb. 2019 | ISSN 2394-7632 | EISSN 2394-7640
SCHOLARS IMPACT An International Multidisciplinary Multilingual Refereed Journal
Nutan Mahavidyalaya, Selu, Dist. Parbhani 8th & 9th February 2019
■National Symposium Series

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

(3)

# मराठी ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कथा साहित्याचे वाङ्मयेतिहास लेखनाचे नव दृष्टिकोन

**प्रा. डॉ. विठ्ठल हरिभाऊ जंबाले**
सदस्य, मराठी अभ्यास मंडळ आणि सदस्य, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
प्रमुख, पदवी व पद्व्युत्तर मराठी विभाग, देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

मराठी भाषा आणि मराठी साहित्य असे दोन स्वतंत्र विभाग मानून त्यांचा स्वतंत्र इतिहास शोधला पहिजे. भाषा ही मानवाचे अर्जित संपत्ती आहे. भाषा ही सामाजिक संस्था आहे, याप्रमाणे मानवाच्या प्रगती किंवा परागतीचे द्योतक म्हणून त्यांच्या भाषेकडे पाहावे लागते. सामाजिक संस्था म्हणून भाषेचे प्रचलन वर्षानुवर्षे घडते. म्हणून कोणतीही व्यक्ती असो वा समाज आपल्या भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्हीशी संबंध्द असतो. विश्वातील सर्व मानवांना आपल्या पूर्वेतिहासाबद्दल कुतुहल असते. त्यामधून मौखिक वा लिखित परंपरेने इतिहास पिढयान् पिढया झिरपत असतो. प्रवाहित होत असतो.

**"इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांचा संशोध"** ही संकल्पना पुढे आलेली आहे. **इति+ह+आस** म्हणजे असे घडले ही व्याख्या सदोष आणि अपुरी आहे. तरीसुद्धा घटना आणि घटना शोधाची सामुग्री म्हणजे इतिहास ही बाब पुढे येत आहे. परंतु ज्यामुळे माणसांच्या जीवनशैलीत स्थित्यंतरे झाली, नवे वळण लागले, तेवढयाच घटनांना इतिहासाच्या संदर्भात महत्त्व असते. कारण इतिहास म्हणजे स्थित्यंतरवेध. जेथे स्थित्यंतर नाही, केवळ स्थितीच आहे. तिथे इतिहास संभवत नाही. डॉ द दि पुंडे यांनी इतिहास म्हणजे भूतकालीन घटनांची नोंद , निवड, मांडणी, परस्पर संबंधाची साखळी, इत्यर्थ , कारणमीमांसा, वर्तमानाशी असणारा अन्वयार्थ असे टप्पे सांगितले आहेत. यासर्व टप्प्यांना ओलांडून सद्यःस्थितीत नवेतिहास मांडला जात आहे.

**उद्दिष्टे-१.** ग्रामीणत्वाचे पैलू शे ाधणे, २.साठोत्तरी प्रवाहातील वेगळेपण नमूद करणे, ३.साहित्येतिहासातील ग्रामीण साहित्याचे महात्म्य कथन करणे, ४.ग्रामीण साहित्याच्या इतिहासामध्ये कादंबरी व कथा वाङ्मयाचे महत्त्व शोधणे, ५.ग्रामीण कथा- कादंबरी लेखनाचे साठोत्तरी वाङमयीन प्रवाहाशी तुलना करणे, ६.एकूण प्रवाह आणि इतिहास यामध्ये साहित्यकृती व लेखक यांचे स्थान निश्चिती करणे

**गृहिते -** १. एखाद्या प्रवाहाच्या चौकटीमध्ये साहित्यकृतीचे मोल ठरविणे, साहित्यकृती आणि लेखक यांना बंदिस्त करून इतिहास लेखन करणे अवघड कार्य आहे. २. मराठी या शब्दाचा व भाषेचा इतिहास हा वाङ्मयेतिहास अभ्यासाचा पाया आहे. ३.मराठी साहित्य प्रकारात कथा व कादंबरी यावाङ्मय प्रकाराचे वेगळेपण आहे. ४.साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहामध्ये ग्राम, ग्रामीण व ग्रामीण साहित्य, ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कथा यासंकल्पना निराळेपण जपून आहेत.

आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचे जनक म्हणून न्यायमूर्ती म गो रानडे यांचे नाव घेणे रास्त ठरते. कारण आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाच्या सुरूवातीच्या काळात A note on the Growth of Marathi literature (१८९८) लिहिलेल्या निबंधातून प्रेरणा घेऊन पांगारकर, आगाशे आणि मोती बुलासा यं ाचे वाङ्मयेतिहासलेखनाचे प्रयत्न झाले. १८९८ मध्ये चर्चासत्रांच्या निमित्ताने पहिल्यांदा मराठी वाङ्मयेतिहास संकल्पनेचा उदय झाला. त्यातूनच "महाराष्ट्र सारस्वत" (विकल भावे- १८९९ पहिली आवृत्ती ग्रंथमाला मासिकातून प्रकाशित), "प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप" (ह.श्री शेणोलीकर) यांच्यासारखे ले ाकप्रिय व पुनः पुन्हा आवृत्ती सिद्ध करून वाङ्मयेहि ासात भर घालणारे अनेक वाङ्मयेतिहासलेखक आहेत. काळानुरूप काही वाङ्मयेतिहासलेखकांनी केलेले प्रयत्न वाङ्मयेतिहासलेखनाचे विविध दृष्टिकोन, प्रवाह, प्रवृत्ती यांची प्रतीती देते. यामधून साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहांच्या अनुषंगाने तथा वाङ्मय प्रकारानुरूप वाङ्मयेतिहासलेखन अभ्यासक, लेखक व समीक्षकांना निरनिराळया अनुभूतीतून समोर आले आहे.

साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाहातील ग्रामीण साहित्य प्रवाहातील कथा आणि कादंबरी याप्रकारांचे इतिहास लेखनामध्ये नवे आयाम प्राप्त व्हावे, यासंकल्पने मधून तळागाळातील माणसांच्या जगण्याला अधोरेखित करण्यामध्ये यासाहित्य प्रवाहाचे उद्गम ,विकास आणि उत्कर्ष झालेले आहेत. साहित्यापासून दुर्लक्षित आशय आणि त्यांच्याच नैसर्गिक अभिव्यक्तीमधून या साहित्यप्रवाहांची जोरकस वाटचाल घडलेली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात खेडयातील नवशिक्षित मंडळीकडून विविध साहित्य प्रकारामधून साहित्य निर्मितीचे प्रयत्न

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

झाले. त्यामध्ये कथा- कादंबरी लेखनामध्ये मोलाची भर पडली आहे. त्यांचे मध्यवर्ती सूत्र ग्रामीण लेखकांनी योजले. खेडे, खेड्यातील संस्कृती, निसर्ग, निसर्ग व मानव यातील नातेसंबंध, कृषिसंकृस्तीशी असलेली घट्ट नाळ, आधुनिकतेशी खेडयाचे वाढते नाते, त्यामुळे ग्रामीण जीवनातील संक्रमण, कमालीचे परिवर्तने, बदलते खेडे या मूलभूत बाबींचे पडसाद कथा-कादंबरीमध्ये उमटले. या साहित्यलेखनामध्ये अस्पर्शित राहिलेल्या बाबीमधून रसरशीत ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले. मात्र ग्रामीण साहित्याची समीक्षा आणि वाङ्मयेतिहासलेखन व्हावे तसे घडले नाही. सर्वंकष आणि गुणात्मक आलोचनाही झाली नाही. म्हणून मराठी ग्रामीण वाङ्मयेतिहासलेखनातून "समग्रलज्यी" विवेचन झाले पाहिजे. ग्रामीण साहित्यकृतीच्या पूर्वखुणां शोधून सर्वांगीण साक्ष घडविण्याचा प्रयत्न होणे अधिक महत्त्वाचे असते.

"ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास" (१९९६) या प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या संपादित ग्रंथामधून ग्रामीण वाङ्मयेतिहासलेखनाचा मागोवा घेण्यात आला. या वाङ्मयेतिहासलेखनातून कथा, कादंबरी, ललितलेखन, कविता, नाटय, आत्मचरित्र, शब्दचित्रात्मक साहित्य, समीक्षा, ग्रामीणत्व, मराठी साहित्यातील स्थान, शेतकरी साहित्य इत्यादी ग्रामीण साहित्यप्रकारांचा ग्रामीण साहित्याच्या चिंतनशील लेखक-अभ्यासक- मीमांसकांनी वेध घेतला. परंतु त्याचे पुनर्रावलोकन ग्रामीण साहित्येतिहासकारांनी अलिकडील काळात आपापल्या कुवतीप्रमाणे केलेले क्वचितच आढळते. "मराठी ग्रामीण कादंबरी" (२००१) डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या ग्रामीण कादंबरी वाङ्मयेतिहासलेखनातून ग्रामीण कादंबरीचा परिशीलन करण्याचा प्रयत्न केला. तसेच "मराठवाडयातील साहित्य", "मराठवाडयातील ग्रामीण कादंबरी -स्वरूप" यापुस्तकामधून कथा आणि कादंबरी यांच्या वाङ्मयेतिहासलेखनातून ऐतिहासिक पर्यालोचन करण्यात आले.

सामान्य माणसाचे जगणे त्यांच्याच दैनंदिन भाषेतून मुखर करणे, स्वानुभवांना साहित्यरूप देणे, अभिजन संस्कृतीला बहुजन संस्कृती हा साहित्यसर्जनासाठी जोरकसपणे उगम पावून त्यास प्रवाहरूप प्राप्त होणे, यामूलप्रेरणांनी मराठी साहित्याचा प्रकारांमधून आणि लेखनकृतीमधून साकार झाले. परिणामता स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी वाङ्मयीन वाटचाल पूर्वासुरींच्या वाटा बदलून नवी वळणे घेऊन कथा-कादंबरी आणि इतर वाङ्मय प्रकारांच्या निर्मितीमधून अवतीर्ण झाली. कथा- कादंबरीमधून कृषिजन संस्कतीची चित्रणे होऊ लागली. ग्रामीण कथा आणि ग्रामीण कादंबरीमधून घडलेल्या विचारप्रवहाचा तथा यासंबंधीच्या जाणिवांचा शोध घेणे अभ्यासक या नात्याने वाङ्मयेतिहासाचे अभ्यासक यानात्याने वाङ्मयेतिहासलेखनाला नवे आयाम मिळवून देते.

एखाद्या लेखकाला अथवा लेखनकृतीला बहुविध संदर्भ लाभण्याची भक्कमता, सक्षमता असते. त्या साहित्यकृतीमध्ये सापडणाऱ्या काही मूल्यांच्या आधारे साहित्यकृतीचे एकसुरीपण दर्शविणारे विवेचन वाङ्मयेतिहासातील मांडणीला बाधा पोहचू शकते. म्हणून वाङ्मयेतिहास लेखकाने बहुविध आयाम, व्यापक तत्त्वे, वैचारिक प्रगल्भता ठेवून मांडणी करणे, अभ्यासकांच्या परिपक्वतेची भिन्न प्रवाह, प्रेरणा आणि प्रवृत्ती यांचे दर्शन घडविते. एकंदरित साठोत्तरी जीवनमान महामानवांच्या उक्ती आणि कृतीने प्रभावित झालेले असून त्याच विचारप्रवाह, प्रेरणा व प्रवृत्ती साहित्याचा अविभाज्य घटक बनलेले आहेत. महामानवांच्या ठळक व पुसटशा पाऊलखुणांचा मागोवा घेणे इतिहास लेखकाला आवश्यक आहे. करिता इतिहासलेखकाची जाण, त्याला वास्तवाचे भान विविध विषयाचे व्यासंग, आकलन वाङ्मयेतिहास लेखनाची कक्षा विस्तृत करणारे ठरतील.

महात्मा जोतिराव फुले हे आधुनिक मराठी साहित्याचे जनक आहेत. त्यांच्या प्रेरणेमधून आधुनिक म्हणजेच आंग्ल काल व आंग्ल कालोत्तर मराठी साहित्याची भरभराट झाली, त्यांचे निर्माते आणि मूलप्रेरणास्थान म. फुले आहेत. पर्यायाने साठोत्तरी वाङमयीन, सामाजिक व इतर चळवळी चे आणि साहित्य प्रवाहांचे उद्‌गाते म्हणून त्यांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांचा प्रभाव ग्रामीण साहित्यावर आहेच. याप्रभावाचे ठळक संदर्भ कथा आणि कादंबरीमधून आलेले आहेत. जोतिरावांच्या लेखणीचा आणि वाणीचा दीर्घकालीन प्रभाव जनमाणसांवर आणि मराठी सारस्वतावर टिकून आहे. त्यांच्या सत्यशोधकी विचारधारेतून मराठी साहित्याचे संचित वृद्धिंगत करण्यामध्ये मोलाचे योगदान राहिले . यासंबंधित आजपर्यंतच्या वाङमय इतिहासकारांनी घ्यावा तेवढा सकारात्मक आढावा घेतला नाही. सत्य इतिहास ग्रंथबद्ध झाला नाही. म्हणून सत्यशोधकी साहित्याच्या अभ्यासकांनी या म. फुले प्रणित इतिहासाची नव्याने मांडणी करण्याचे प्रयत्न केले. डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्या कष्टातून "सत्यशोधी साहित्याचा इतिहास" वाचकांसमोर आलेला आहे.

महामानवांच्या प्रेरणा व सत्त्व घेवून मराठी साहित्यामध्ये विविध वाङ्मयीन प्रवाह उदय, विकास आणि उत्कर्ष झालेले दिसतात. त्यांच्या मुळाशी महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या अंत:प्रेरणा दडलेल्या होत्या. त्यामुळे लेखनप्रवाहात दाखल झालेला नवशिक्षित वर्ग या महापुरूषांचे उत्तरदात्वि चालवित आहोत,असे जाहीरपणे व्यक्त केले. कथा - कादंबरी लेखनातून महापुरूषांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करू लागले. त्यांच्या लेखनामधून सुत्रबध्दतेने मांडले. परिणामता महामानवांच्या विचार आणि कार्याच्या कथनातून लेखकांने मांडणी केलेली आहे. त्या संकल्पना मध्यवर्ती ठेवून लेखकानी कथा -कादंबरी लेखन केले. याचा मागोवा अभ्यासकांनी घेतला पाहिजे.

ग्रामीण कथा-कादंबरी या वाङ्मयप्रकारांची संकल्पना, स्वरूप, विशेष, प्रकार व घटक यांचा मागोवा मार्मिकपणे घेता आला पाहिजे. ग्रामीण कथा-कादंबरी साहित्येतिहासलेखनासाठीचे प्रयत्न अतिशय तोकडे आहेत. साहित्येतिहास लेखनासाठीचे

ग्रामीण कथा-कादंबरी साहित्येतिहासलेखनत्याचे अलिकडे कार्यक्षेत्र दृष्टिकोन, तंत्र आणि गतकालापसून आजपर्यंत निर्माण झालेल्या ग्रामीण कथा-कादंबरी साहित्येतिहासलेखन अपुरे ठरले आहे. याकरिता विद्यापीठीय अभ्यासक्रमात देशीभाषांचा शिरकाव असला पाहिजे. वाङ्मयेतिहास अध्यापकांनीच अभ्यासक केवळ विद्यापीठीय अभ्यासक्रमाशी संबंधित आहेत. त्यांनी मराठी वाङ्मयाला चिटकून राहावे, ही भूमिका ठेवल्यास ग्रामीण कथा-कादंबरी साहित्येतिहासलेखन समृद्धतेनजीक पाहचेल, याबाबत साशंकता नाही.

लिखित वा मुद्रित साहित्याचा मागोवा घेत असताना केवळ ग्रंथबध्द साहित्य आधारभूत मानून इतिहास लेखन करण्यात येते. तसेच लिखित साहित्यामध्येही गाजलेल्या, आवडत्या, जवळच्या ओळखीच्या लेखकांच्या साहित्यकृतीच्या अनुषंगाने भरपूर विवेचन करण्याकडे इतिहास लेखकांचा कल दिसते ा. त्यामुळे वास्तव झाकोळण्याची दाट शक्यता असते. पुरस्कार प्राप्त साहित्यकृतींबद्दल ऐतिहासिक अवलोकनामध्ये आस्वादात्मक व अतिरिक्त विवेचन केलेले आढळते. तसेच पुरस्कारापासून कोसोदूर, वाचकांपासून प्रकाशनापासून न पोहचलेल्या साहित्यघटकांपर्यंत वाङ्मयेतिहासकार पोहचणे उपयुक्त ठरेल. समीक्षकांच्या अभिप्रायापासून अथवा समीक्षणापासून अलिप्त राहिलेल्या साहित्यकृतीचे अवलोकन झाले पाहिजे. परंतु वाङ्मयीन गुणांनी सरस असलेल्या साहित्यकृतींबद्दल त्रोटक माहिती नोंद असणे, हे वाङ्मयेतिहासाच्या लेखनाचा असमतोल दर्शविते. त्यामुळे वाङ्मयीन हानी घडते. करिता इतिहासलेखकाने त्याच्यावरील संस्कार, जगण्याची-अध्ययनाची चाकोरी आणि इतिहासलेखन परंपरांचे जोखड झुगारून दिले पाहिजे. दुर्लक्षित साहित्यकृतीच्या नोंदी घेऊन वाङ्मयेतिहास अधिकाधिक समृद्ध आणि संपन्न बनविला, तरच त्यांचे वाङ्मयेतिहासलेखन कार्य ऐतिहासिकदृष्टया चिरंतन ठरेल.

----

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded